दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५४ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.५ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.
Scan QR code to visit... Epaper Portal

# धक्कादायक:मंत्रालयातच बनावट कागदपत्रांचा स्कॅम उघड

## उच्चपदस्थ अधिकारी देखील आढळले दोषी,अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मंत्रालयात बनावट कागदपत्रांचा महत्त्वाचा स्कॅम उघड झाला आहे. या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली असून यात मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचा देखील समोर आले आहे. या संदर्भात अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

सदरील प्रकार समोर आल्यानंतर या प्रकरणाची उच्चस्तरीय गोपनीय चौकशी करण्यात आली आहे. या चौकशीमध्ये तात्कालीन उपसचिव किशोर भालेराव हे स्वतः दोषी आढळून आले आहेत. त्यांच्याबरोबरच विशेष सरकारी वकील शेखर जगताप, श्यामसुंदर आणि शरद अग्रवाल हे देखील दोषी आढळले आहेत. त्यांचादेखील आरोपींमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. अनेक संबंधित गुन्ह्यात विशेष सरकारी वकील म्हणून बनावट कागदपत्रांच्या आधारे वकिलांची नियुक्ती केल्याची माहिती यामध्ये समोर आली आहे. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.कोणत्याही प्रकारची सक्षम आणि कायदेशीर मान्यता न घेता भालेराव यांनी बनावट आदेश पत्र जारी केल्याचे या चौकशी अहवालामध्ये समोर आले आहे. त्यामुळे गृह मंत्रालयाने किशोर भालेराव यांना निलंबित केले आहे. इतकेच नाही तर गँगस्टर छोटा शकील याच्याशी संबंधित खटल्यात देखील ही बनावट कागदपत्र वापरण्यात आल्याचे अहवालात समोर आले आहे. विशेष म्हणजे ही कागदपत्र बार कौन्सिल कडे देखील सादर करण्यात आली आहे. या संदर्भात संजय पुनामिया यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रार नंतर सदर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.







# ईव्हीएम विरोधात गोंडपिपरीत हजारो नागरिक रस्त्यावर

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

ईव्हीएम या मशीनचा सत्ताधारी पक्षाकडून गैरवापर केला जात असल्याचा आरोप करून गोंडपिपरी तालुक्यातील ओबीसी कृती समिती,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे,वंचित बहुजन आघाडी, गोंडवाना गणतंत्र पार्टी, सीआयटियु,एआयटियु, भारतीय बौद्ध महासभा,निवृत्त कर्मचारी संघटना,शिक्षण रोजगार बचाव समिती,शासकीय कंत्राटी कर्मचारी संघ यांच्यासह विविध राजकीय पक्ष सामाजिक संघटनांच्या पुढाकारातून सोमवारी दि.(४) ईव्हीएम हटाव,जी प शाळा बंद करण्याचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा,स्वामिनाथन आयोग लागू करावे, क्रिमिलियरची अट रद्द करण्यात यावी, जबरानजोत शेतकऱ्यांना कायमस्वरूपी पट्टे देण्यात यावे,जातनिहाय जनगणना व्हावी अशा अनेक मागण्या घेऊन शिवाजी चौक ते तहसील कार्यालयापर्यंत शहरात जनाकोश मोर्चा काढला.

ईव्हीएम मुळे निवडणुका पक्षपाती राहत नाही जगातील विकसित राष्ट्र या प्रणालीचा वापर करत नाहीत त्यामुळे सत्ताधारी पक्षाकडून ईव्हीएमचा आग्रह का केला जातोय असा प्रश्न यावेळी उपस्थित मान्यवरांनी मोर्चाला संबोधित करतांना व्यक्त झाले.सभेनंतर तहसिलदरांना निवेदन देऊन मोर्चाची सांगता करण्यात आली.मोर्चात हजारो युवक,महिला,शाळकरी मुलांचा सहभाग होता.यावेळी सेवानिवृत्त संवर्ग विकास अधिकारी शालिकराव माऊलीकर, सेवानिवृत्त तहसीलदार केडी मेश्राम, ओबीसी कृती संघर्ष समितीचे मोरेश्वर सुरकर,शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडूरवार,काँग्रेस शहर अध्यक्ष राजू झाडे, वंचित बहुजन पार्टी तालुका अध्यक्ष प्रकाश तोहगावकर,ओबीसी नेते पाल,नगराध्यक्ष सविता कुळमेथे,उपनगराध्यक्ष सारिका मडावी, नगरसेवक वनिता देवगडे,रियाज कुरेशी, तुकाराम सातपुते,गौरव घुबडे,पंकज डांगी,दर्शन वासेकर,अशपाक कुरेशी,शुभम ढपकस,शैलेश बैस,संदीप लाटकर,नबात सोनटक्के,प्रशांत खेडेकर,सरपंच देविदास सातपुते,गौतम झाडे,सारनाथ बकशी,अशोक कुडे,फलके,चैताली फुलझले, काँग्रेस महिला तालुकाध्यक्ष सोनी दिवसें, रेखा रामटेके, नितेश मेश्राम,ओबीसी नेते शंकर पालं यांच्यासह हजारो नागरिकांचा सहभाग होता

# पुलगावच्या ग्रामीण रुग्णालयात कुर्ला भागातील अनेक रुग्ण दाखल

## विषबाधा की दूषित पाण्याचा पुरवठा



**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या नाचणगाव ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या न्यू कुर्ला भागात अनेक रुग्ण पोटदुखी,संडास, उलट्या यामुळे त्रस्त होऊन येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल होत आहे. एकाच भागातील रुग्ण दाखल होत असल्यामुळे त्यांना विषबाधा झाली की या भागामध्ये दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. याबद्दल तर्कवितर्क सुरू आहे.

दिनांक ३ मार्च सायंकाळ पासून ग्रामीण रुग्णालयामध्ये येथील कुर्ला भागात राहणारे काही रुग्ण पोटदुखी, संडास,उलट्या या त्रासाने कंटाळून उपचारासाठी दाखल होत आहे. दिनांक तीन मार्च ला तीन रुग्ण व दिनांक ४ मार्चला सात रुग्ण ग्रामीण रुग्णालयात उपचार उपचारासाठी दाखल झाले. एकाच भागातील एकच प्रकारच्या त्रासाने त्रस्त झालेले रुग्ण रुग्णाला दाखल होत असल्याने या भागात दूषित पाण्याचा पुरवठा तर होत नाही ना? अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. पुलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पाझारे यांनी एकाच परिसरातील समान लक्षणाचे रुग्ण रुग्णालयात दाखल होत असल्यामुळे चिंतेचा विषय असून या भागामध्ये दूषित पाण्याचा पुरवठा किंवा विषबाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे सांगितले. विश्वासनीय सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार या भागातील काही लोकांनी एका मंदिरात सामूहिक स्वयंपाक केला होता. या जेवणामध्ये सहभागी झालेल्या कुटुंबांमध्येच हा प्रकार दिसून आलेला आहे. त्यामुळे त्यांच्या जेवणात शरीराला अपायकारक काही पदार्थ जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे

# सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्या-आ.जोरगेवार

## कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा यांना मागणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जीर्णावस्थेत असलेल्या चंद्रपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रशासकीय इमारत,वर्गखोल्या, कार्यशाळा, समुपदेशन केंद्र, आणि वसतिगृहाचे नव्याने बांधकाम करण्याकरीता १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा यांना केली आहे. सदर मागणीचे निवेदनही आमदार किशोर जोरगेवार यांनी ना. लोढा यांना दिले आहे.

वन अकादमी येथे इंडस्ट्रीय एक्पो अँड बिझनेस कॉक्लेव्ह चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा हे चंद्रपूर दौ-यावर होते. यावेळी सदर निवेदन देत आमदार किशोर जोरगेवार यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

चंद्रपूर येथे विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण मिळण्यासाठी १९६३ ला शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सुरुवात करण्यात आली. सद्यस्थितीती चंद्रपूर येथे ११ एकर च्या परिसरात शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून २२ ट्रेड मिळून ५१ युनिट मध्ये सुमारे ११०० विद्यार्थी नवीन तंत्रज्ञानयुक्त औद्योगिक प्रशिक्षण घेण्यासाठी येथे येत असतात. असे असतांना मागील ६० वर्षाच्या काळात येथे अपेक्षित असे काम केल्या गेलेले नाही. परिणामी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रशासकीय इमारत व वर्गखोल्या, कार्यशाळा व समुपदेशन केंद्र जीर्ण झाले असल्याने प्रशासकीय कामकाजात तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यातच विद्यार्थ्यांचे वसतिगृह निर्लेखित करण्यात येत असल्याने बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना निवासाची सोय उपलब्ध नाही. तसेच केंद्रातील क्रीडांगण दुरुस्ती करणे आवश्यक आहे.अद्ययावत तंत्रज्ञान, सोयीसुविधा, विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि जीर्ण इमारतीमुळे सुरक्षतेच्या दृष्टीने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चंद्रपूर येथे प्रशासकीय इमारती आणि वर्गखोल्या, कार्यशाळा आणि समुपदेशन केंद्राचे नव्याने बांधकाम करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता येथे सुसज्ज, प्रशस्त व अद्ययावत सोयी सुविधा युक्त प्रशासकीय इमारत व वर्गखोल्या, कार्यशाळा आणि समुपदेशन केंद्र, वसतिगृह व क्रीडांगण बांधकाम करण्यासाठी एकत्रित १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी सदर निवेदनाच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

## मला वेळ वाया घालवायचा नाही

# माझ्या समोर महाराष्ट्राचे काम, निवडणुकीत नागरिकच निर्णय घेतील-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**मुंबई**–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पहिल्यांदाच आदित्य ठाकरे यांनी दिलेला आव्हानाला उत्तर दिले आहे. आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवडणुकीला उभे राहण्याचे अव्हान दिले होते. तुम्ही माझ्या वरळी मतदारसंघात निवडणुकीला माझ्या विरोधात उभे राहा किंवा मी तुमच्या ठाण्यात तुमच्या विरोधात उभे राहतो, असे आव्हान आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले होते. आदित्य ठाकरे यांच्या आव्हानाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र, नाव न घेता उत्तर दिले आहे. माझ्याकडे वाया घालवायला वेळ नाही, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले. माझ्यासमोर मोठ्या महाराष्ट्राचे काम असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रामध्ये सत्ता स्थापन झाली. मात्र, त्यानंतर आदित्य ठाकरे हे वारंवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्यासोबत गेलेल्या सर्व शिवसेनेच्या नेत्यांवर आरोप करत आहे. यातच वारंवार निवडणुकीचे आवाहन आदित्य ठाकरे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देत आहेत. तुम्ही माझ्या वरळी मतदारसंघातून माझ्या विरोधात निवडणूक लढवण्यासाठी या किंवा मी तुमच्या ठाणे मतदारसंघात निवडणूक लढवण्यासाठी येतो, असे आवाहन आदित्य ठाकरे देत आहेत. या आव्हानाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आतापर्यंत उत्तर दिले नसले तरी आता एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता उत्तर दिले आहे. त्यांच्या प्रश्नाला श्रीकांत शिंदे आणि त्यांचे सहकारी उत्तर देत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.मला खूप मोठे महाराष्ट्राचे काम आहे. एकच मतदारसंघ माझ्यासाठी महत्त्वाचा नाही. येणाऱ्या काळामध्ये निवडणुकीमध्ये याचा निर्णय नागरिकच घेतील की, कोणी कुठे उभे राहावे आणि कोणी कुठे निवडून येतो. हे आता नागरिकच ठरवणार आहे. त्यामुळे त्यांच्या प्रश्नावर उत्तर द्यायला मला माझा वेळ वाया घालवायचा नाही. अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता प्रत्युत्तर दिले आहे. यासंदर्भात श्रीकांत शिंदे आणि इतर बोलत आहे, त्यामुळे या संदर्भात मला काहीही बोलायचे नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. मला हा प्रश्न नसता विचारला तर बरे झाले असते, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

सह्याद्रीचा राखणदार



# शाळा बंद केल्या जाताहेत, मग गेला कुठे बालहक्क कायदा?

**बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम– २००५ या कायद्याअंतर्गत दि.५ मार्च २००७ साली राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग म्हणजेच एनसीपीसीआर अर्थात नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स याची स्थापन करण्यात आली. हा आयोग महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत आहे. या आयोगाशी समांतर संपूर्ण देशात आरटीई– राइट टू एज्युकेशन ॲक्ट– २००९ लागू करण्यात आला आहे. त्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीने शिक्षण दिले जावे, अशी तरतूद केली आहे, मात्र क्रमिक पुस्तकें व गणवेश एसटी आणि एससी जात संवर्गातील मुलांनाच दिले जातात. इतर मागास व बिगर मागास संवर्गातील मुलांना वगळून वंचित ठेवले जात आहे. मग कुठे गेला बालहक्क कायदा? असा सवाल करण्यास जनतेला भाग पाडले जात आहे, हे या आयोगापुढे खरे आव्हान म्हणावे लागेल. याविषयीची अभ्यासपूर्ण सखोल माहिती अलककार– श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दशैलीतून... संपादक.**

आयोगाच्या या कार्य स्वरूपात अधिनियमाचे निर्धारित प्रकार– अ) मुलांसाठीच्या संरक्षण कायद्यातल्या कुठल्याही सुरक्षा उपायांची पडताळणी आणि त्याच्या फेर तपासणीसाठी आणि प्रभावी कार्यान्वयासाठीचे उपाय सुचविणे आणि केंद्र सरकार समोर ते सादर करण्यासाठी आणि या कामांवर लक्ष ठेवण्यासाठीचे सुरक्षा उपाय; आ) आतंकवाद, हिंसा, दंगे, प्राकृतिक आपदा, घरेलू हिंसा, एचआईवी– एड्स, चोऱ्या, दुर्व्यवहार, यातना आणि शोषण, वेश्यावृत्ती आणि अश्लील साहित्य अशा गोष्टी ज्यामुळे मुलांचे जीवन प्रभावित होते, आदी कारणांचा आभ्यास करणे व त्यावर उपाय शोधणे; इ) मुलांच्या जीवनात येणाऱ्या संकटांसंबंधीत असलेल्या गोष्टींमध्ये लक्ष घालणे व संकटात सापडलेली, परिवारांपासून हरवलेली किंवा परिवारविहीन मुले आणि तुरुंगात असलेली मुले यांच्या पुनर्वसनाचे काही उपाय शोधणे; ई) समाजाच्या विभिन्न विभागांतील मुलांच्या अधिकारांचा व साक्षरतेचा प्रचार करणे आणि त्यांच्यासाठी असलेल्या या अधिकारांच्या सुरक्षा उपायांची त्यांना जाणीव करुन देणे; उ) केंद्र सरकार किंवा कुठलेही राज्य सरकार किंवा इतर आधिकारांच्याअधिपत्या खाली येणारी बाल सुधारगृहे, कुठलीही शैक्षणिक संस्था यांवर लक्ष ठेवणे, त्यावर लक्ष ठेवण्याची कारणे शोधणे किंवा मुलांच्या कोणत्याही राहण्याच्या ठिकाणांवर लक्ष ठेवणे; जेथे मुलांना सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी ठेवून घेतले जाते. ऊ) मुलांच्या अधिकारांच्या उल्लंघनाची चौकशी आणि अशा मामल्यांमधील कार्यवाही सुरू करण्याचे उपाय आणि स्वप्रेरणेशी संबंधित मामल्यांची सूचना. ए) मुलांना अधिकारांपासून वंचित आणि त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन. ऐ) मुलांच्या संरक्षण आणि विकासाच्या कायद्यांचे गैरप्रकार. ओ) गैरनीती निर्णयांची मते, दिशानिर्देश, त्याबद्दलची मते, मुलांच्या विकासाची हमी आणि अशा मुलांची सोडवणूक. औ) अशा मामल्यांना योग्य अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अथवा मांडणे. अं) येणाऱ्या संधींचा आभ्यास करण्यासाठी, अन्य अंतरराष्ट्रीय उपकरणे आणि अस्थित्वात असणाऱ्या योजनांचे वेळोवेळी फेरविचार करण्यासाठी, मुलांच्या हक्कावर अधारित इतर घडामोडी, मुलांच्या हिताकरीता व त्यांच्या विकासात मदत देण्यासाठी; अः) मुलांच्या हक्काच्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांचा, योजनांचा अभ्यास करणे व त्या व्यवहारांचे अनुपालन करणे. मुलांवर अधारीत असलेल्या योजनांच्या कोणत्याही मुद्द्यांवर चौकशी करणे, त्यावर आलेख तयार करणे आणि मुलांच्या हक्काच्या बाल अधिकार कायद्यावर टिपण्णी करणे; क) मुलांच्या कामावर गंभीरतेने विचार करणे, मुलांसाठी काम करणाऱ्या संस्था व सरकारी खाते यांना पाठींबा देणे; ख) मुलांच्या अधिकारांबद्दल सुक्ष्मज्ञान किंवा सर्व माहितीचा प्रसार करणे; ग) मुलांच्या महितीचे संकलन व चौकशी करणे; घ) मुलांच्या हक्कांची माहिती शाळांच्या आभ्यासक्रमांमध्ये, शिक्षक प्रशिक्षणांमध्ये आणि मुलांच्या व्यक्तिगत शिक्षणामध्ये प्रसारित करणे; असे आहेत.

आयोगाच्या संरचनेत ३ वर्षांच्या कालावधीसाठी केंद्र सरकारद्वारे खालील सभासदांचा समावेश करण्यात येतो– १) अध्यक्ष, जो प्रसिद्ध असेल आणि मुलांच्या विकासासाठी खास काही काम केलेले असेल. २) शिक्षणक्षेत्रात, मुलांचे आरोग्य, विकास, किशोर न्याय, टाकलेल्या वा दुरावलेल्या मुलांबद्दल काळजी असणारे, दिव्यांग– अपंग, बाल कामगार, बाल मनोविज्ञान आणि मुलांसाठीचे कायदे जाणणारे, याबाबत अनुभव, प्रसिद्धी, अखंडता, स्थैर्य आणि क्षमता असलेले ६ सभासद असतील. ३) सचिवालय सदस्य, जो संयुक्त सचिवाच्या खालोखाल नसेल. ४) वयोमर्यादा ही अध्यक्ष यांसाठी ६५ वर्षे तर सदस्यांसाठी ६० वर्षे आहे. ५) पुनर्नियुक्ती दोन पेक्षा जास्त वेळा नियुक्ती करता येत नाही. या आयोगाला खालील सर्व सिव्हील कोर्टाचे आणि खासकरून पुढील मुद्द्यांवर आधारीत हक्क असतील: अ) भारताच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तिवर शपथ लादणे आणि ती लागू करणे; आ) कोणत्याही दस्ताऐवजांचा शोध व त्याचे उत्पादन; इ) कायदेशीर बाबी व साक्षींची मागणी करणे; ई) कोणत्याही सार्वजनिक माहितीची किंवा कोणत्याही कायदेशीर कार्यालयातून प्रतिंची मागणी; उ) आयोगाच्या दस्ताऐवजांच्या पाहणीसाठी साक्षीदार नेमणे, हे आहेत.

आयोगाच्या मुख्य आधिकाऱ्यांमधून एक अधिकारी बाल हक्काच्या तक्रारींवर चौकशी करतो. आयोगाला बाल हक्कांच्या काही गंभीर तक्रारींवर स्वतः लक्ष घालावे लागते. त्यावर परिणाम करणाऱ्या कारणांचा शोध लावावा लागतो. बाल हक्काबद्दल त्यांना आनंदाने प्राप्त करवून दिली पाहिजे. १) संविधानाच्या ८व्या सूचिप्रमाणे तक्रारी या आयोगाकडे कोणत्याही भाषेत दिल्या जाऊ शकतात. २) अशा तक्रारींवर कोणतेही दर आकारले जाऊ नये.३) तक्रारीच्या कारणाचे स्वरुप स्पष्ट व कारणाचे संपूर्ण स्पष्टकरण केलेले असावे. ४) आयोग पुढील माहिती किंवा शपथपत्र गरज भासल्यास काढू शकते. तक्रार करतांना कृपया तक्रारीत खालील बाबी आल्या आहेत ना याची खात्री करुन घ्यावी: तक्रार स्वच्छ आणि सुपाठ्य असावी, तक्रार अस्पष्ट, अनाम आणि खुप नांवांची नसावी. अशा प्रकारच्या तक्रींवर कोणतीही फी आकारली जाऊ नये. नमूद केलेला मुद्दा हा कोणत्याही नागरिक विवादाशी जसे जमीन–जुमला हक्क, संविदागत दायित्व यांच्याशी संबंधीत नसावा. नमूद केलेला मुद्दा सेवांशी संबंधीत नसावा. तक्रारींचा मुद्दा कोणत्याही अन्य आयोगासमोर आधी मांडलेला नको किंवा तो कोणत्याही आयोगात, कायद्यात, कोर्टात वा आधिकरणात अडकलेला नसावा. आयोगाच्या वतीने मुद्दा अजून सिद्ध झालेला नसावा. आयोगाच्या आवाक्याबाहेर किंवा काही इतर कारणास्तव आवाक्याबाहेर गेलेला मुद्दा असता कामा नये.

आयोगाची कार्ये– बाल हक्क संरक्षणासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांतर्गत उपलब्ध संरक्षणाची तपासणी, परीक्षण करणे व त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे. लहान मुलांना हक्काचा उपभोग घेण्यापासून रोखणार्या कारणांची तपासणी करणे व त्याबाबत योग्य उपाययोजना सुचवणे. बाल हक्कांबाबत जागृती घडवून आणणे. बालसुधार गृहांची तपासणी करणे व गरज असल्यास संबंधित अधिकाऱ्यांना उपाय सुचविणे. बाल हक्क उल्लंघनाच्या घटनांची चौकशी करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांना कारवाई सुरू करण्याची शिफारस करणे. आदी सांगता येतील. बालहक्क संरक्षण आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्र बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना जुलै २००७मध्ये झाली.

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम– २००५ या कायद्याअंतर्गत दि.५ मार्च २००७ साली राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग म्हणजेच एनसीपीसीआर अर्थात नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स याची स्थापन करण्यात आली. हा आयोग महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत आहे. या आयोगाशी समांतर संपूर्ण देशात आरटीई– राईट टू एज्युकेशन ॲक्ट– २००९ लागू करण्यात आला आहे. त्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीने शिक्षण दिले जावे, अशी तरतूद केली आहे, मात्र क्रमिक पुस्तकें व गणवेश एसटी आणि एससी जात संवर्गातील मुलांनाच दिले जातात. इतर मागास व बिगर मागास संवर्गातील मुलांना वगळून वंचित ठेवले जात आहे. मग कुठे गेला बालहक्क कायदा? असा सवाल करण्यास जनतेला भाग पाडले जात आहे, हे आज या आयोगापुढे खरे आव्हान म्हणावे लागेल.

!! राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग चिरायू होवो !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**

---

# अभेद अभिषेकी आणि शिखरनाद कुरेशी यांच्या गायन आणि जेंबेवादनाने पंढरपूरकर रसिक तृप्त

## पद्मश्री पं.जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाची रसिकश्रोत्यांच्या उदंड प्रतिसादात सांगता

**पंढरपूर | प्रतिनिधी**

तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे नादब्रह्म कला फाउंडेशन करकंब आणि मनमाडकर परिवार पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पद्मश्री पं.जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.आणि दोनदिवशीय संगीत महोत्सवाची सांगता झाली




सुरुवातीला पं.वसंत मराठे,पं.हेमंत पेंडसे,सौ.रश्मीताई अभिषेकी.श्री भगवान भाऊ मनमाडकर सौ.शुभांगीताई मनमाडकर उस्ताद झाकीर हुसेन यांचे पुतणे आणि उस्ताद तौफिक कुरेशी यांचे सुपुत्र शिखरनाद कुरेशी,अभेद शौनक अभिषेकी, पं.मधुकर धुमाळ, श्रेणीक दोशी,उदय उत्पात,एस पी कुलकर्णी, संयोजक ज्ञानेश्वर दुधाणे प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून पं.शौनक अभिषेकी यांचे सुपुत्र आणि शिष्य अभेद अभिषेकी यांच्या गायनाला सुरुवात झाली.सुरुवातीला राग शुध्द कल्याण व झुमरा तालात आणि राग अभोगी अतिशय सुंदर सुरेख गायन करत... अभिषेकी बुवांची तिसरी पिढी अभिजात शास्त्रीय संगीताचा वारसा जपण्यासाठी तयार असून निश्चितच शास्त्रीय संगीताला चांगले दिवस येणार याची जाणीव झाली.त्यांना तितकीच सुंदर अप्रतिम साथसंगत तबला गीत इनामदार हार्मोनियम अमेय बिच्चू, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ धनंजय मनमाडकर यांनी दिली.त्यानंतर ख्यातनाम जंबेवादक शिखरनाद यांनी या आफ्रिकन वाद्यावर तबल्याची भाषा लीलया वाजवत रसिकश्रोत्यांना मंत्रमुग्ध करुन सोडल.यांनी आपल्या वादनातून एकेक एकेक कायदे,रेले,उलगडत उलगडत शिखरनाद ही आपल्या परंपरागत सांस्कृतिक जपत आगळ्यावेगळ्या वाद्यांची भूरळ तरुणाईला आकर्षित करणारं एवढं मात्र नक्की.त्यांना अप्रतिम संयमी लेहरा साथसंगत अमेय बिच्चू यांनी दिली.यानंतर अभेद अभिषेकी यांनी सगुण संपन्न पंढरीचा राजा,अभंग सादर करत अप्रतिम तराणा गाऊन भैरवीने कार्यक्रमाची सांगता करत रसिकांना मंत्रमुग्ध करत अविस्मरणीय क्षणाची अनुभुती दिली.सुंदर सुत्रसंचलन राजेश खिस्ते यांनी केले तर आभार आयोजक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मानले.कार्यकमाचे यशस्वी करण्यासाठी स्पॉन्सर जोतीचंद भाईचंद सराफचे श्रेणिक दोशी,, हॉटेल महावीर रसोई चे राहुल पुरवत, विनायक परिचारक क्लासेस यांनी अनमोल योगदान दिले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भगवान भाऊ मनमाडकर, शुभांगीताई मनमाडकर धनंजय मनमाडकर ज्ञानेश्वर दुधाणे माधुरी जोशी, स्वानंदी काणे,निता कुलकर्णी,वैभव केंगार, तुकाराम दुधाटे,सोमा रणपिसे, देवकी दुधाणे,अंजली टकले, आरती मनमाडकर, उमेश केसकर, राजेश खिस्ते,अनेक पंढरपूरकर कलासाधकांचे आणि कलारसिक श्रोत्यांचे सहकार्य लाभले.

---

# श्री गजानन महाराज प्रकट दिन सांगोल्यात उत्साहात साजरा



**सांगोला | प्रतिनिधी**

श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळा रविवार दि.३ मार्च रोजी चौंडेश्वरी मंदिर,कोष्टी गल्ली,सांगोला येथे श्री संत गजानन महाराज भक्त परिवार सांगोला यांनी विविध धार्मिक कार्यक्रमाने मोठ्या उत्साहाने साजरा केला.शनिवार दि.२ मार्च रोजी सकाळी ६ वा.श्री गजानन महाराजांच्या मूर्तीस दुग्धाभिषेक करुन श्री गजानन विजय ग्रंथाच्या २१ अध्यायाचे एक दिवसाचे महापारायण संपन्न झाले.रविवार दि.०३ मार्च रोजी सकाळी ९ ते १२ वा. सामुदायिक पुरुष भजन संपन्न झाले.त्यानंतर गण गण गणात बोते चा गजर करत दु.१२:०५ मिनिटांनी श्री गजानन महाराजांवर पुष्पवृष्टी करण्यात आली.नंतर आरती करुन नैवेद्य दाखवून महाप्रसाद देण्यात आला.तसेच सायंकाळी ५ वा.सांगोला शहरातून पालखी सोहळा संपन्न झाला.यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# 'मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळे'त पंढरपुरातील चिंचणी जि.प.शाळेचा तिसरा क्रमांक

**सोलापूर :** 'मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा' अभियानात सोलापूरसह राज्यभरातील जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका व खासगी अशा एक लाखांहून अधिक शाळांनी सहभाग नोंदवला होता. सोलापूर जिल्हा परिषदेच्या चिंचणी (ता. पंढरपूर) येथील शाळेने पुणे विभागात तिसरा क्रमांक पटकावला आहे. तर खासगी शाळांमधून निंबर्गी येथील श्री बसवेश्वर हायस्कूल विभागात दुसरा क्रमांक पटकावला. मंगळवारी (ता. ५) मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या शाळांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.




शाळांमधील भौतिक सोयी-सुविधा, गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम, विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता, स्वच्छता अशा विविध बाबींच्या आधारावर राज्यातील सर्वोत्कृष्ट ६६ शाळांची निवड या अभियानातून करण्यात आली आहे. पंढरपूर तालुक्यातील पर्यावरणपूरक चिंचणी गावाची ओळख राज्यभर आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी देखील जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच या गावात पहिल्यांदाच सर्वसाधारण सभा घेतली होती. तत्पूर्वी, त्यांनी चिंचणीतील जिल्हा परिषदेच्या शाळेला देखील भेट दिली होती. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील मुलांप्रमाणेच तेथील विद्यार्थी इंग्रजी, अंकगणितात अव्वल असल्याचे दिसून आले होते.या शाळेला आता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानाअंतर्गत पुणे विभागात तिसरा क्रमांक मिळाला आहे. खासगी शाळांमधून दक्षिण सोलापुरातील निंबर्गी येथील श्री बसवेश्वर विद्यालयाने विभागात दुसरा क्रमांक पटकावला आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्या उपस्थितीत या शाळांचा गौरव होणार आहे.सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७८८ शाळा असून महापालिकेच्याही जवळपास ५८ शाळा आहेत. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात जिल्ह्यातील बहुतेक शाळांचा सहभाग होता. पण, राज्यस्तरावर जिल्ह्यातील एकही शाळा निवडली गेली नाही. विभागीय स्तरावर सोलापूर जिल्हा परिषदेच्या एकाच शाळेची निवड झाली आहे. महापालिकेची एकही शाळा ना राज्य ना विभागीय स्तरावर पोचली. या अभियानामुळे शासकीय व खासगी अनुदानित शाळांच्या गुणवत्तेबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत. राज्यभरात अशीच स्थिती असल्याचे समोर आले आहे.

---

# रोटरी क्लब सांगोला यांचा व्यवसाय सेवा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**सांगोला | प्रतिनिधी**

रोटरी क्लब सांगोला यांच्या वतीने पाच व्यक्तींना दिनांक ३ मार्च रोजी व्यवसाय सेवा पुरस्कार देण्यात आले. व्यवसाय सेवा पुरस्कार प्राप्त व्यक्तींमध्ये श्री एस एम सिंग,स्टेशन मास्तर




सांगोला यांचा समावेश करण्यात आला. यांचा परिचय रो. हमीद शेख यांनी करून दिला. सांगोला स्टेशन परिसरात स्वच्छता, वृक्षारोपण लक्ष वेधून घेते. कामाची वेगळी आवडच माणसाला असावी लागते.काम दोन प्रकारचे असतं एक व्यवसाय म्हणून आणि एक सेवा म्हणून तर सेवा म्हणूनच काम अत्यंत श्रेष्ठ आहे ते या स्टेशन मास्तर यांनी केलेले आहे.

पुरस्कार प्राप्त श्री नितीन भोसले हे त्यांच्या वडिलांच्या संस्काराप्रमाणे आजही काम करत आहेत. यांची ओळख रो. महेश गवळी यांनी करून दिली. भोसले यांचे वडील केस कापण्यासाठी येणाऱ्या पहिल्या गिऱ्हाईकाचे पैसे समाजसेवेसाठी खर्च करत असत. नितीन भोसले हे शिक्षक आहेत तरी ते त्यांच्या मोकळ्या वेळात व जादाच्या वेळेत केस कापण्याचे काम करतात आणि त्यातून मिळणारे सर्वच्या सर्व उत्पन्न आपल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करतात.


पुरस्कार प्राप्त श्री .संजय दिघे हे विषमुक्त शेतीसाठी वाढेगाव परिसरात प्रसिद्ध आहेत. यांची ओळख रो. वैजनाथ घोंगडे यांनी करून दिली. आजपर्यंत हजारो शेतकऱ्यांना त्यांनी विषमुक्त शेती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केलेले आहे. बाजारात मिळणारे तेल भेसळयुक्त आहे म्हणून शुद्ध तेलासाठी त्यांनी लाकडी घाण्याची सुद्धा सोय उपलब्ध करून दिलेली आहे. मुलांच्या वाढदिवसाला ते गोरगरीब मुलांना सायकल भेट देतात. अनाथ आश्रम, वृद्धाश्रम अशा ठिकाणी नेहमीच मदत करतात. रोटरी क्लब सभासदांसाठी स्वस्त दरात तेल काढून देण्याची ऑफर सुद्धा त्यांनी जाहीर केली.

पुरस्कार प्राप्त श्री.दत्तात्रय दहिवाडकर यांचे वडील कोर्टामध्ये पाणी भरण्याचे काम करत होते. कोर्टामध्ये सेवा देण्याचे काम दहिवाडकर यांनी सुद्धा सोडलेले नाही. दत्तात्रय दहिवाडकर यांनी कोर्टामध्ये स्वतःचे कॅन्टीन सुरू केले आहे आणि ते अत्यंत प्रेमळपणे सर्वांना चहा देतात. त्यांचा परिचय देताना ड.सचिन पाटकुलकर म्हणाले की, कोर्टाचा मूड तयार करण्याचे काम दहिवाडकर करतात. यांचा सकाळचा चहा कोर्टाचा मूड बदलतो.

पुरस्कार प्राप्त बापूसाहेब भाकरे यांचा परिचय रो विलास बिले यांनी करून दिला.भाकरे कुटुंबीय हे सांगोल्यामध्ये समाजसेवेसाठी सर्वश्रुत आहे. बापूसाहेब हे सर्व थरातल्या लोकांना समाजसेवेसाठी सुपरीचीत आहेत. बापूसाहेबांचे वैशिष्ट्य म्हणजे ते केलेली मदत कधीही सांगत बसत नाहीत. दिलेले दान हे उजव्या हाताचे डाव्या हाताला कळू नये म्हणतात अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे. सद्या राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम पूर्णत्वाकडे जात आहे, त्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

अशा पाच व्यक्तींना व्यवसाय सेवा पुरस्काराने रोटरी क्लबच्या वतीने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अध्यक्ष डॉ.साजिकराव पाटील यांनी प्रास्ताविक केले. रो विकास देशपांडे यांनी व्यवसाय सेवा पुरस्काराबद्दलची माहिती दिली. व्यवसाय सेवा पुरस्कार या विभागाचे रोटरी मधील प्रमुख रो.संतोष गुळमिरे यांनी कार्यक्रमाची खर्चासह जबाबदारी घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चार्टर सदस्य रो.दीपक चोथे यांनी भूषविले. अध्यक्षांनी आपल्या मनोगतात सर्व पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील जादाच्या कामासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या व या पुरस्कारा पाठीमागची रोटरी ची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमासाठी अर्बन बँकेचे चेअरमन रो डॉक्टर प्रभाकर माळी यांनी हॉल उपलब्ध करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रो.संतोष भोसले यांनी केले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी २५ रोटरी सदस्य हजर होते व सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. याबद्दल रोटरी क्लबच्या वतीने सर्वांचे हार्दिक हार्दिक आभार.

# गण गण गणात बोतेच्या गजराने दुमदुमली पुलगाव नगरी



**पुलगाव । प्रतिनिधी**

श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त स्थानिय हाउसिंग बोर्ड कॉलनीतील श्री गजानन महाराज मंदिर परिसरातून दुपारी ३ वाजता श्री ची मोठ्या उत्साहात पालखी व मिरवणूक निघाली. खुल्या जिप मधे भागवतकार तिरथ दादा महाराज विराजमान होते.सात दिवस मंदिर परिसरात भागवत आयोजन करण्यात आले होते.भजन दिंड्यांच्या टाळ व ढोलकीच्या गजराने आसमंत दुमदुमून गेला होता.

हजारो भक्तगण दिंडीबरोबर श्री गजानन माऊलीचा जयजयकार करीत मार्गक्रमण करीत होते. मिरवणूकीच्या अग्रभागी बँडपथक भक्तीगीतांनी वातावरण निर्मिती करीत होते.त्यानंतर भगवा ध्वज फडकविणाऱ्या स्वारासह घोडा,दिंडी,भजन मंडळ, गजानन महाराजांचे देखावे , हजारो महिला,पुरुष, लहान मुले हाउसिंग बोर्ड कॉलनी ते वर्धा नदीच्या तटावर वरून राम मंदिर समोरून, मिल रोड ते हरिराम नगर येथे पोहोचले.येथे साई सेवा दल तर्फे श्री च्या पालखीचे पुजन व सत्कार करण्यात आला. संपुर्ण परिसर सडा, रांगोळी घालुन सजविण्यात आला होता. मिरवणूकवर आजूबाजूच्या घरावरून तसेच बाजुला उभ्या असलेल्या भक्तांकडून पुष्पवृष्टी करण्यात येत होती. विनाधारी वारकऱ्यांचे पादप्रच्छालन करून पुजन करण्यात येत होते.फळाहार, चहा, थंड पाणी, खोबरा लाडू वितरित करून मिरवणूकीतील भक्तांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

त्यानंतर गांधीनगर मध्ये गांधीनगर नगर परिवार तर्फे पालखीचे पूजन करण्यात आले व मठ्ठा वितरण करण्यात आला. मार्गावर रांगोळी काढण्यात आली. त्यानंतर नाचणगाव रोडवर बालाजी मंदिर समोर पालखीचे पूजन प्रसाद वितरण करण्यात आले. नाचणगाव रोडवर लोकांनी पूजन केले. फुटाणा लाईन मध्ये पूजन करण्यात आल्यावर प्रसाद वितरण करण्यात आले. गांधी चौक मध्ये वैष्णो ज्वेलर्स परिसरात श्री गजानन महाराजांचे जिवंत रूप अमरावतीच्या नाट्य कलावंताने साकार केले होते.वैष्णो ज्वेलर्स च्या वतीने चहा व प्रसाद वितरण करण्यात आले.पालखीचे पूजन करण्यात आले.भगतसिंग चौक मध्ये प्रसाद वितरण करण्यात आले. श्री गजानन महाराज मंदिरातून निघालेल्या मिरवणुकीचे स्थानिक जागृती किराणा स्टोअर जवळ जागृती किराणा व मित्र परिवारातर्फे स्वागत व पूजन करण्यात आले. याप्रसंगी मंदिर पदाधिकाऱ्यांचा दुपट्टा व नारळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळेस गजानन सरदार, संजय गाते, संदीप बोरकुटे, मंगेश झाडे, नरेश ठाकूर, अमित खुराना, शैलेश पारधेकर, राजेश गुप्ता, चंद्रशेखर बेले, शकील खान, स्वराज भोपळे, अनिल लेकुरवाळे, प्रवीण चिंचोलकर, मनोज राऊत सह मोठया संख्येत नागरिक उपस्थित होते. तसेच नाचणगाव येथील साईकृपा सेवा मंडळाचे स्वच्छता दूत, जे मिरवणूकनंतर मार्ग स्वच्छ करीत होते त्यांचाही या निमित्ताने सत्कार करण्यात आला.आठवडी बाजार चौक मध्ये प्रसाद वितरण करण्यात आले.कॅम्प रोड वरून स्टेशन चौक मध्ये मठा वितरण करण्यात आले.श्री च्या पालकी चे लोकांनी दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी अलोट होती.४ मार्चला मोठ्या प्रमाणावर महाप्रसाद मंदिर परिसरात आयोजन करण्यात आले आहे. १० हजार लोकांच्या महाप्रसाद घेण्यासाठी भक्त गण मंदिर परिसरात लाभ घेत आहे.संत गजानन महाराज देवस्थान ट्रस्ट कडून करण्यात आले.१०दिवस गजानन महाराज मंदिर मंदिर सदस्य कार्यकर्ते या यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष मनोज देशमुख, उपाध्यक्ष प्रमोद घालनी, सचिव, सुनिता मिश्रा,प्रकाश मेटे, निलेश खापर्डे, सतिश गांधी, मनोज चव्हाण,सौरभ मेटे, संदीप एकबोटे,नरेश हेमणे, अमित पाडे इत्यादी प्रयत्नरत होते. येथील शास्त्रीनगर मधील गजानन मंदिरामध्ये सुद्धा श्री गजानन महाराज प्रकट दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. येथे संगीत रजनी चाल भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सोमवार दिनांक ४ मार्चला मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्री गजानन महाराजांच्या फोटोंनी पूर्ण मार्ग सुशोभित करण्यात आला होता. प्रकट दिनाच्या निमित्त गुरुनानक मंगल कार्यालय जवळ अमित फेब्रिकेशन समोर गजानन महाराज भक्तां तर्फे सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शहरामध्ये ठीक ठिकाणी गजानन महाराजांचा प्रकटोत्सव उत्साहाने साजरा करण्यात आला.

# ‘उमेद’ अभियानातील तालुकास्तरीय सर्व बचत गटाची आढावा सभा संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

आमदार कीर्तिकुमार भांगडीया व खासदार अशोक नेते यांच्या प्रमुख उपस्थितीत अभ्यंकर मैदान (किल्ला), चिमूर येथे उमेद’ अभियानातील तालुकास्तरीय सर्व बचत गटाची आढावा सभा पार पडली. या सभेप्रसंगी आमदार कीर्तिकुमार भांगडीया यांनी उपस्थित मान्यवरांसह सर्वप्रथम सर्व थोर महात्म्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन केले व दीपप्रज्वलन करून सभेचे उद्घाटन करण्यात आले.



त्यानंतर आमदारांनी महिला-भगिनींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना व गटांना मिळणारे लाभ यावर मार्गदर्शन केले. उपस्थित महिला-भगिनींना राज्य शासनाच्या विविध योजना व त्याचे स्वरूप व फायदे याबाबत माहिती देऊन जास्तीतजास्त लाभ घेण्याचे आवाहन केले.

तसेच, उमेद’ अभियानातील तालुकास्तरीय सर्व बचत गटांच्या महिला-भगिनींशी व अभियानाशी संबंधित अधिकाऱ्यांशी अनेक विषयांवर सखोल चर्चा करून सविस्तरपणे आढावा घेण्यात आला. दरम्यान, उमेद तालुका अभियान, पंचायत समिती चिमूर यांच्या वतीने आमदार कीर्तिकुमार भांगडीया व खासदार अशोक नेते यांच्या आगमनाप्रसंगी उपस्थित माता-भगिनींनी उत्स्फूर्तपणे औक्षण करत स्वागत केले आणि शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रामुख्याने गट विकास अधिकारी पंचायत समिती चिमूर राजेशकुमार राठोड सर, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. श्यामजी हटवादे, भाजपा तालुकाध्यक्ष राजू पाटील झाडे, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष राजू देवतळे, भाजयुमो प्रदेश सचिव मनिष तुंम्पल्लीवार, भाजपा ज्येष्ठ नेते प्रकाश वाकडे, भाजपा ज्येष्ठ नेते घनश्याम डुकरे, भाजपा ज्येष्ठ नेते विलास डांगे, उमेद अभियान तालुका समन्वयक बारसागडे व अन्य मान्यवर आणि तालुक्यातील सर्व बचत गटातील बहुसंख्य महिला-भगिनी, भाजपा नेते, पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

# सेंट ॲन्स हायस्कूल मूलच्या विद्यार्थ्यांची कर्करोगग्रस्त रुग्णाना आर्थिक मदत

**मुल । प्रतिनिधी**

आजच्या धावपळीच्या युगात अनेकांना विविध आजारांचा सामना करावा लागतो.या आजारांचे पैशांच्या अभावी निराकरण होत नाही.पैशाची जुळवाजुळव करताना अनेकांना तारेवरची कसरत करावी लागते आणि पैशाअभावी कधीकधी जिवाला मुकावे लागते.अशी जीवघेणी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून अनेक सामाजिक संस्था मदतीकरिता पुढाकार घेत असतात.




कर्करोगग्रस्त रुग्णांना मदत करणारी अशीच एक नामांकित संस्था पराकाष्ठा फाउंडेशन,लखनौच्या माध्यमातून सेंट न्स हायस्कूल मुलच्या मुख्याध्यापिका रेव्ह.सि. शॅलेट सेबॅस्टियन यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांनी गोळा केलेले एक लाख दहा हजार सहाशे चाळीस रुपये मदत म्हणून देण्यात आले.पालकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी जी रक्कम गोळा केली,शाळेच्या वतीने शाळेच्या व्यवस्थापिका रेव्ह.सि.लिली सेबॅस्टियन यांचे द्वारा पराकाष्ठा फाउंडेशनचे प्रकाश देशमुख पांडे यांना सुपूर्द करण्यात आली.सर्वात जास्त रक्कम गोळा करणारे वर्ग पहिली ते नववीचे विद्यार्थी अनुक्रमे अन्विती घोंगे,शरयू माहुरपवार,अरीना मिस्त्री, अनन्या कुंभरे,राज येरोजवार,श्लोक रायकंटीवार,तन्मय नामपल्लिवार,स्मित रामटेके व क्रिती निमगडे यांना प्रमाणपत्र व उचित बक्षीस देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल कामिडवार यांनी तर उपस्थितांचे आभार विद्यार्थी प्रतिनिधी श्रेयस कोकाटे ने मानले.आर्थिक मदत करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका रेव्ह.सि.शॅलेट सेबॅस्टियन,शिक्षक व पालकांनी खूप कौतुक केले.शाळेच्या वतीने समस्त पालकांचे आभार मानण्यात आले.

# शक्तीवंदन उपक्रमाअंतर्गत मॅराथॉन स्पर्धा संपन्न

## नारीशक्तीला देशाच्या वाटचालीसाठी मुख्य हातभार-हरीश शर्मा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता महिला मोर्चाच्या माध्यमातुन शक्तीवंदनाच्या कार्यक्रमांतर्गत संपूर्ण देशासह चंद्रपूर जिल्हयात आजपासून सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत आज चंद्रपूर जिल्हयातील दुर्गापूर येथे मुली व महिलांची मॅराथॉन स्पर्धा घेण्यात आली. या मॅराथॉन स्पर्धेच्या अंतर्गत असंख्य मुली व महिलांनी सहभाग नोंदविला.



रन फॉर नॅशन,रन फॉर मोदी या आशयाचा संदेश भारतीय जनता पार्टी जिल्हा चंद्रपूरचे अध्यक्ष हरीश शर्मा यांनी सर्व स्पर्धकांना दिला. धावणे या व्यायामाचा प्रकार अंगीकृत करून आरोग्य सुदृढ करण्याचे मौलीक मार्गदर्शन भाजपा जिल्हा महामंत्री तथा नारीशक्ती वंदन मुख्य संयोजक डॉ. मंगेश गुलवाडे यांनी केले. यामॅराथॉन स्पर्धेत मुलींमधून प्रथम क्रमांक वैष्णवी कुनघाडकरयांनी तर काजल रणदिवे व शानवी पवार यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकाविला. महिलांमध्ये पहिला क्रमांक माधुरी मुनघाटे,दुसरा अश्विनी पाकमोडे तर तिसरा ज्योती मोहितकर यांनी पटकाविला.या शक्तीवंदन कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून आयएमए च्या अध्यक्षा डॉ. किर्ती साने ह्या उपस्थित होत्या. तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा महामंत्री कु. अल्का आत्राम,प्रदेश सचिव विद्याताई देवाळकर,जिल्हयाचे महामंत्री ब्रिजभूषण पाझारे,संध्याताई गुरनुले,रामपाल सिंह,महिला मोर्चा अध्यक्षा वंदना शेंडे,माजी महामंत्री नामदेव डाहूले,महिला मोर्चा महामंत्री निलम सुरावार,पोंभुणाच्या नगराध्यक्षा सुलभाताई पिपरे,महिला मोर्चा महामंत्री प्रियंका लांबट,उपाध्यक्ष भाजपा वंदना सिन्हा यांनी विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राकेश बोमनवार,श्रीनिवास जंगम,रूद्रनारायण तिवारी,मयुर भोकरे,शोभा पिदुरकर,कोमल भरगडे,किर्ती कातोरे,अरूणा चौधरी,केमा रायपुरे,गिता सिंग,गीता रणदिवे यांनी अथक परिश्रम घेतले.

# वढोलीत गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात साजरा



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

संत गजानन महाराज सांस्कृतिक कला मंच वढोलीच्या वतीने गजानन महाराज प्रकट दिन दि.३ रविवारी गोंडपिपरी तालुक्यातील वढोली येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम सकाळी हनुमान मंदिरात गुरुदेव सेवा भजन मंडळाचे भजन पार पडले त्यानंतर ११ वाजता दरम्यान संपूर्ण गावात गजानन महाराजांची पालखी काढण्यात आली.यावेळी पालखी सोहळ्यात 'घोडा' सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.गावात संपूर्ण कुटुंबीय घरासमोर रांगोळी काढून परिसर स्वच्छ ठेऊन पालखी चे स्वागत केले.दिवसभर गावातील प्रत्येक चौकात पालखीचे स्वागत करत अल्पोपहार,चहा,पाण्याची व्यवस्था नागरिकांनी केली. सायंकाळी संपूर्ण गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून भव्य भोजन दान ठेवले.रात्री ९ वाजता समाजप्रबोधनकार सप्तखंजेरीवादक उदय पाल महाराज यांचे कीर्तन पार पडले.यावेळी शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

# अवैध गोवंश हत्या व वाहतुकीकर बंदीची मागणी

## कारवाई न झाल्यास आंदोलनाचा बजरंग दलाचा इशारा

**आर्वी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य गोवंश हत्या प्रतिबंध कायदाची कठोर अंमलबजावणी तसेच वाढती बेकायदेशीर गोवंश वाहतुकी व गोवंश हत्यावर कठोर कारवाई करण्याबाबत निवेदन विष्णुप्रसाद भारती यांनी दिले.

महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायदा लागू आहे. कायद्यानुसार गाय, बैल व वळू यांचे मास सेवन करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे. कायद्यानुसार गोहत्या हा दंडनिय अपराध असून गोहत्या करणाऱ्या गुन्हेगाराला कठोर शिक्षा न्यायदेवते कडून केली जाते. गाय ही हिंदू धर्म व संस्कृतीचे प्रतीक मानले जाते. पण आर्वी शहर व ग्रामीण रस्त्या मार्गानी मोठ्या प्रमाणामध्ये बेकायदेशीर गोवंश वाहतूक ही गोवंश हत्ये साठी केली जाते. गुन्हे नोंद होऊन देखील गोतस्करी सुरूच आहे. मुक्या जीवांचा छळ केला जात आहे. बेकायदेशीर गोवंश वाहतूक करून कत्तलखाण्यापर्यंत पोहचवली जातात. एक प्रकारे प्रशासनाला आवाहन देण्याचे काम गोमाफिया करत आहेत का.असा प्रश्न आर्वीकर नागरिकांना व शिवभक्त - गोभक्तांना पडत आहे. गोवंश हत्या बंदी कायद्याची कडक अंबलबजावणी प्रशासनाने करून बेकायदेशीर गोवंश वाहतूक व हत्या थांबवून आद्यगोरक्षक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या भुमीचे पावित्र्य जपण्यात यावे.अशी मागणी बजरंग दल आर्वी तालुका संयोजक विष्णुप्रसाद भारती यांनी पोलिस प्रशासनाला निवेदन देऊन केली आहे.




कोणतीही कारवाई न केल्यास समस्त शिवभक्त गोरक्षक, गोभक्त-गोप्रमीचा मोठा मोर्चा काढणार याची नोंद प्रशासनाने घ्यावी.असा इशारा दिला आहे.

# आगीने घर जळुन नुकसान झालेल्या कुटुंबीयांची आमदार किशोर जोरगेवार यांनी घेतली भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रात्रीच्या सुमारास घरी कोणी नसताना अस्लम पठाण यांच्या घराला आग लागल्याची घटना काल रात्रीच्या सुमारास इंदिरा नगर येथे घडली. या आगीत अस्लम यांचे मोठे आर्थिक नुसकसान झाले आहे. दरम्यान आज आमदार किशोर जोरगेवार यांनी पठाण कुटुबीयांची भेट घेत त्यांना आर्थिक मदत केली आहे.



अस्लम पठाण यांच्या घरी विवाह कार्यक्रम होता त्यामुळे ते घरी दिवा लाहून कार्यक्रमाला गेले होते. सदर दिव्यामुळे घराला आग लागली असावी असा अंदाज आता वर्तविला जात आहे. घराला आग लागल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी पाणी टाकुन आग विजवली मात्र तोवर घरातील सामान जळून खाक झाले होते. यात त्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.दरम्यान आज रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी इंदिरा नगर येथे जात पठाण कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी आगी मागचे कारण समजून घेतले आहे. तसेच पठाण कुटुबीयांना राषण उपलब्ध करुन देत आर्थिक मदत केली आहे. शासनानेही या घटनेचा पंचणामा करुन शासनातर्फे मिळणार असलेली मदत प्रक्रिया जलद करावी अशा सुचना अधिका-यांना केल्या आहेत. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, रणजित मडावी, फैजान शेख, सुरज कामडे, कुणाल गोंगल, हरिश मतारे, रतन धोके आदींची उपस्थिती होती.

सह्याद्रीचा राखणदार



# नागरिकांचे सहकार्य आणि शुभेच्छांनी ताडोबा महोत्सव यशस्वी-वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

## चैतराम पवार यांना पहिला वनभूषण पुरस्कार ;तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाचा समारोप







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे वर्णन 'चांदा ते बांदा' असे केले जाते. त्यामुळे प्रगतीच्या क्षेत्रात चंद्रपूर जिल्हा नेहमी अग्रेसर असावा, असा आपला प्रयत्न आहे. जगप्रसिद्ध असलेला ताडोबा व्याघ्र प्रकल्प हा आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा, म्हणून येथे तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाला नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सहकार्यामुळे हा महोत्सव यशस्वी झाला. ताडोबा महोत्सवामुळे चंद्रपूरची ख्याती संपूर्ण जगात गेली, असे मनोगत राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले.

चांदा क्लब ग्राउंड येथे राज्य शासन व वन विभागाच्या वतीने पहिला वनभूषण पुरस्कार धुळे जिल्ह्यातील चैतराम पवार यांना देण्यात आला. यावेळी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते. कार्यक्रमाला उत्तराखंडचे वनमंत्री सुबोध उन्नीयाल, वनविभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महीप गुप्ता, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, उत्तराखंडचे प्रधान मुख्य वनसंरक्षक अनुप मलिक, जिल्हाधिकारी विनय गौडा, सीआयडी फेम शिवाजी साटम आदी उपस्थित होते.वाघाची भूमी असलेल्या चंद्रपूर जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने जगाचे केंद्र व्हावे, या उद्देशाने ताडोबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, असे सांगून वनमंत्री मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूरला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचा आपला प्रयत्न आहे. गत तीन दिवसांपासून ताडोबा महोत्सव हा सोशल माध्यमांमध्ये सर्वोच्च ट्रेंडवर पोहोचला आहे. तसेच या महोत्सवाकरिता उपस्थित असलेल्या विश्वसुंदरी स्पर्धेतील स्पर्धकांनी त्यांच्या देशातसुद्धा समाज माध्यमातून ताडोबा महोत्सवाचा प्रचार आणि प्रसार केला, ही चंद्रपूरकरांसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे.पुढे ना .मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूरचा वाघ आता जगात पोहोचला आहे, हे आपले यश आहे. वनांचे संरक्षण करणाऱ्यांना आजपासून वनभूषण पुरस्कार देण्यात येत आहे. आदिवासी क्षेत्रात काम करणारे चैतराम पवार यांना २० लक्ष रुपयांचा पहिला वन भूषण पुरस्कार देताना अतिशय आनंद होत आहे. या महोत्सवाच्या प्रेमापोटी एशियन हार्ट इन्स्टिट्यूटचे जगप्रसिद्ध शल्य चिकित्सक डॉ. रमाकांत पांडा, सीआयडी फेम अभिनेते शिवाजी साटम, विश्वसुंदरी स्पर्धेतील स्पर्धक आदींनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली. विशेष म्हणजे येथील नागरिकांनी ताडोबा महोत्सवाला केलेले सहकार्य हे अभूतपूर्व आहे. त्यामुळेच हा उत्सव यशस्वी होऊ शकला, असेही वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

### चैतराम पवार यांना पहिला वन भूषण पुरस्कार

आदिवासी कल्याण वनवासी आश्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि गुजरात सीमेवरच्या १०० गावांमध्ये वन आणि वन्यजीव संरक्षणासाठी काम करणाऱ्या धुळे जिल्ह्यातील बारीपाडा गावचे चैत्राम पवार यांना पहिला वनभूषण पुरस्कार ताडोबा महोत्सवात वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी त्यांना २० लक्ष रुपयांचा धनादेश व मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.पुरस्कार मिळाल्यानंतर मनोगत व्यक्त करताना चैतराम पवार म्हणाले, राज्य सरकारने या पुरस्कारासाठी तळागाळातील माणसाला शोधले. या पुरस्कारामुळे काम करण्याची जबाबदारी आणखी वाढली आहे. वनवासी कल्याण आश्रम तसेच वनविभागाच्या सर्व वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या कामासाठी मोलाचे सहकार्य केले आहे. १५-१६ गावांचे क्लस्टर करून सामुदायिक वन विकसित करण्याचे आमचे प्रयत्न आहे. जल, जंगल, जमीन, पशुधन या माध्यमातून शाश्वत विकास शक्य असून हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नव्हे तर खानदेशाचा गौरव असल्याचे पवार म्हणाले.

### विविध क्षेत्रातील मान्यवरांना / संस्थांना पुरस्कार वितरण

ताडोबा महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमात विविध संस्था तसेच मान्यवरांना पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट ग्राम पर्यावरण विकास समिती अंतर्गत चेकबोर्डा, मारूडा, देवाडा, सातारा या गावांना पुरस्कार देण्यात आला. उत्कृष्ट प्राथमिक कृतीदल पुरस्कार वायगाव, मोकासा, करवल, खातेदा, कोंडेगाव, गोंडमोहळी या गावांना, आदर्श वणवा व्यवस्थापन पुरस्कार आडेगाव, डोनी, दुधाळा, वासेरा, रानतळोदी या गावांना, ग्रामपरिस्थितीय पर्यावरणाचा उत्कृष्ट पुरस्कार मामला, आगरझरी, निंबाळा, बोर्डा या गावांना, उत्कृष्ट निसर्ग मार्गदर्शक पुरस्कार विनोद उईके, कृष्णा पाटील, मनोज भलावी, विराज राऊत यांना शाश्वत पर्यटन आणि सेवा देणारे उत्कृष्ट पुरस्कार ससारा जंगल लॉज, ताडोबा होम स्टे कॉटेज, ताडोबा टायगर व्हॅली रिसॉर्ट यांना, वन्यजीव संवर्धनासाठी सामाजिक दायित्व पुरस्कार मिटकॉन कन्सल्टन्सी, आयसीआयसीआय फाउंडेशन, हेमेंद्र कोठारी फाउंडेशन, सनफ्लॅग फाउंडेशन यांना, वन्यजीव अधिवास विकास पुरस्कार डॉ. गजानन मुरदकर, डॉ. पी.डी. कडूकर, ट्री फाउंडेशन, तरुण पर्यावरणवादी मंडळ, आणि इको - प्रो यांना, शीघ्रबचाव दल पुरस्कार डॉ. रविकांत खोब्रागडे, डॉ. कुंदन पोल, अभय मराठे, अमोल कोरपे यांना तर उत्कृष्ट छायाचित्र पुरस्कार गोलू बाराहाते, देवानंद साखरकर आणि कमलेश ठाकूर यांना देण्यात आला. तसेच यावेळी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे माजी क्षेत्रीय संचालक वीरेंद्र तिवारी, नितीन काकोडकर, एस.एच. पाटील यांना सुद्धा मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# 'डव्हान्टेज चंद्रपूर २०२४-इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह' चे थाटात उद्घाटन

## 'देश के निर्माण में, चंद्रपूर मैदान में' -ना.सुधीर मुनगंटीवार

## लक्ष्मी मित्तल ग्रुपसह १९ सामंजस्य करारांवर झाल्या स्वाक्षरी





**चंद्रपूर । आशिष घुमे**

देशाच्या विकासात आता चंद्रपूर महत्वाची भूमिका निभावणार असून ॲडव्हांटेज चंद्रपूरच्या माध्यमातून लक्ष्मी मित्तल ग्रुपसह १९ कंपन्यांशी सामंजस्य करार केले गेले आहेत. चंद्रपूर प्रशासन या सर्व कंपन्यांच्या पाठीशी पूर्ण शक्तीनिशी उभे राहून केवळ चंद्रपूरच नाही तर देशाच्या विकासातही हातभार लावेल असे म्हणत वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र सरकार तसेच, चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी 'देश के निर्माण में चंद्रपूर मैदान में' अशी घोषणा केली.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा प्रशासन, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, चंद्रपूर व असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'डव्हांटेज चंद्रपूर २०२४ - इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह' चे सोमवारी थाटात उद्घाटन झाले. चंद्रपूर फॉरेस्ट कॅडमी ऑफ डमिनिस्ट्रेशन डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट (वन अकादमी) येथील विद्युत हॉलमध्ये झालेल्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.कार्यक्रमाला कौशल्य विकास व उद्योजकता कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र सरकार, ना.मंगलप्रभात लोढा यांच्यासह आमदार किशोर जोरगेवार, न्यू ईरा व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे, लॉईडचे मधूर गुप्ता, कुमार वार, राकेश प्रसाद, राजेश झंझाड, जी. डी. कामडे, आलोक मेहता, के. जी. खुबाटा, मधुसूदन रुंगटा, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, सीईओ विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालिवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

दीपप्रज्वलन, राज्यगीत व ॲडव्हांटेज विदर्भवरील चित्रफितीने कार्यक्रमाला सुरुवात झाली. चंद्रपूर जिल्हयाच्या विकासासाठी व स्वावलंबी होण्यासाठी ना.सुधीर मुनगंटीवार यांनी आयोजित केलेल्या 'ॲडव्हांटेज चंद्रपूर'ला उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस व ना.अजित पवार यांनी शुभेच्छा दिल्या.ना .सुधीर मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूर हे आतापर्यंत कोल, सिमेंट यासाठी ओळखले जात होते आता ते 'कॅश' साठी पण ओळखले जाईल. येथे स्थापन झालेले उदयोग भविष्यात भरपूर पैसा कमावतील. करार झालेल्या कंपन्यांच्या विविध परवानगींसाठी 'वन विंडो सिस्टीम' तयार करण्यासोबतच एअरपोर्ट, रेल्वे, रस्ते आदी पायाभूत सुविधा, कौशल्य विकासाचे विविध अभ्यासक्रम, संशोधन कार्यक्रमांवर भर दिला जाणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. मंगलप्रभात लोढा यांनी सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्याचे कौतुक केले. हे 'ॲडव्हांटेज चंद्रपूर' नसून 'ॲडव्हांटेज सुधीर मुनगंटीवार' आहे. चंद्रपूरला गोल्डमाईन बनण्याची त्यांच्यात क्षमता आहे, असे ते म्हणाले. आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या. विवेक जॉन्सन यांनी ॲडव्हांटेज विदर्भ व चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा प्रशासनाने विविध कंपन्यांशी केलेल्या सामंजस्य करारासंदर्भात माहिती सांगितली. विनय गौडा यांनी चंद्रपूर जिल्ह्याच्या सामाजिक, औद्योगिक व आर्थिक विकासाबद्दल विस्तृत सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर व श्यामल देशमुख यांनी केले. ना .सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या 'ॲडव्हांटेज चंद्रपूर २०२४' ला उद्योग मंत्रालय, महाराष्ट्र सरकार आणि एमएसएमई मंत्रालय, भारत सरकारचे सहकार्य लाभले आहे.'ॲडव्हांटेज चंद्रपूर'च्या उद्घाटन सत्रात लक्ष्मी मित्तल ग्रुपसह एकुण १९ सामंजस्य करार करण्यात आले. या सुमारे ७५ हजार ७२१ कोटी रुपयांच्या करार करण्यात आले ज्या द्वारे भागात ५० हजारहून अधिक रोजगार निर्माण होणार आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी जिल्हा प्रशासनाच्यावतीने या करारावर स्वाक्षरी केले. या विविध करारांवर आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेडचे अलोककुमार मेहता, न्यू ईराचे व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे , लॉईड मेटल्सचे मधूर गुप्ता, चंद्रपूर सोलारचे राजेश ओसवाल, अंबुजा सिमेंट के सुब्बुलक्ष्मणन, अरविंदो रिॲलिटी इन्फ्रोस्ट्रक्चर प्रा. लि. संजय मिश्रा, राजुरी स्ट्रील्सचे विपीन जैन व विवेक गुप्ता, सनफ्लॅग अँड स्टील कंपनी लिमिटेडचे एस. महादेवन अय्यर, अल्फालॉजिक टेक्सेस लिमिटेडचे अंशु गोयल, वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड हर्षल दातार, अल्ट्राटेक एसीसीचे अतुल कंसन, डेस्टीनो मिनरल्सचे मोरेश्वर झोडे, एसआयएडी युएसएचे उमेश दिघे व अनंत एव्हियेशनचे संचालक यांनी स्वाक्षरी केल्या. मान्यवरांच्या हस्ते यावेळी भव्य प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनीमध्ये कोल माईन्स, मिनरल्स, स्टील, बाम्बू, फिशरीज, टुरिजम के साथ साथ, लॉजिस्टिकस, डेअर, ग्रीन एनर्जी, रियल एस्टेट, ऑटोमोबाईल, फार्मास्यूटिकल्स अशा विविध क्षेत्राशी संबंधित सुमारे १५० स्टॉल्स आहेत. मान्यवरांनी यावेळी या प्रदर्शनीची पाहणी केली कौतुक केले.

### ५० वर्षांचे व्हिजन तयार करा-ना.नितीन गडकरी

**चंद्रपूर जिल्हयाच्या क्षमता आणि कमतरता या बाबींचा विचार करून या जिल्ह्याच्या विकासासाठी, जिल्ह्याला समृद्ध व संपन्न करण्यासाठी सुधीर मुनगंटीवार यांनी ५० वर्षांचे व्हिजन तयार करावे, अशा सूचना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्हिडिओ संदेशातून केल्या. चंद्रपूरमध्ये ॲडव्हेंचर स्पोर्ट्स, वॉटर स्पोर्टस, पर्यटन, पर्यटकांसाठी इलेक्ट्रीक गाड्या, रिसॉर्टस, बांबू लागवड, मत्स्यव्यवसाय यावर काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.**

### चंद्रपूरमध्ये स्टील प्लांट उभारणार-अलोककुमार मेहता

**लक्ष्मी मित्तल ग्रुपचे संचालक मायनिंग अँड स्ट्रॅटेजिक प्रोजेक्ट अलोक कुमार मेहता यांनी महाराष्ट्रात येऊन सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्याची संधी मिळाल्याबद्दल ना .सुधीर मुनगंटीवार यांचे धन्यवाद व्यक्त केले. चंद्रपूरमध्ये ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून स्टील प्लांट स्थापन करण्यात येणार असून त्यामाध्यमातून ६० हजार प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती केली जाईल, असे ते म्हणाले. मधुसूदन रुंघटा यांनीही मनोगत व्यक्त केले.**

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये २०२८ प्रकरणी यशस्वीपणे निकाली



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष एस. एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये २०२८ प्रकरणे यशस्वीपणे निकाली काढण्यात आली.

सदर लोक अदालतीमध्ये प्रलंबित न्यायालयीन १०३१० व दाखल पूर्व १९५४५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांपैकी १०१६ प्रकरणे तर दाखल पूर्व प्रकरणांपैकी १०१२ प्रकरणे निकाली काढण्यात आली. प्रलंबित प्रकरणांमध्ये मोटर वाहन अपघात नुकसान भरपाईची एकूण १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून नुकसान भरपाई २ कोटी ९ लक्ष ७१ हजार ३८० रुपये वसूल करण्यात आले. यापैकी एका प्रकरणात सर्वाधिक ८४ लक्ष रकमेचा नुकसान भरपाईसाठीचा धनादेश गोडीजीट विमा कंपनी मार्फत पक्षकारात देण्यात आला.भूसंपादन प्रकरणांपैकी एकूण नऊ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून मोबदल्याची रक्कम ५८ लक्ष २६ हजार ९१० अदा करण्यात आली आहे. कौटुंबिक वाद म्हणजेच घटस्फोटाच्या प्रकरणांपैकी पाच प्रकरणांमध्ये पक्षकांनी एकत्र राहण्याचा समजुतीने निर्णय घेतला. धनादेश प्रकरणापैकी १०७ प्रकरणे निकाली काढण्यात आली तर औद्योगिक व कामगार न्यायालयातील सात प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये निकाली काढण्यात आली आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयात लोक अदालत यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायाधीश, सर्व वकील, न्यायालयीन कर्मचारी व पोलीस कर्मचारी आदींनी सहकार्य केल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी दिली.

# टायर गोदाम स्फोट प्रकरणाचा छडा लावण्यात सांगोला पोलिसांना यश



**महूद** - सांगोला तालुक्यातील महूद येथे टायरच्या गोदामात स्फोट होऊन लागलेल्या आगीच्या प्रकरणाचा छडा लावण्यात सांगोला पोलिसांना यश आले आहे. जागा मालकासह टायर दुकानदाराने विमा कंपनीची दोन कोटी ४५ लाख रुपयांची फसवणूक करून आर्थिक लाभ मिळवण्याच्या उद्देशाने हे कट कारस्थान रचल्याचे निष्पन्न झाले आहे.यामध्ये टायर गोदामाला आग लावण्यासाठी त्यांनी प्लास्टिक सोल्युशन व पेट्रोलचा वापर केला आहे.या प्रकरणात सांगोला तालुक्यातील एकासह सांगली जिल्ह्यातील तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यातील मुख्य सुत्रधार नितीन नरळे हा फरार आहे.महूद-दिघंची रस्त्यालगत लक्ष्मीनगर(ता. सांगोला) येथील नितीन पांडुरंग नरळे यांच्या मालकीची इमारत आहे. या इमारतीमध्ये विठलापूर ता.आटपाडी जि.सांगली येथील रामेश्वर दत्तात्रय बाड यांचे टायरचे गोदाम होते.या गोदामात शुक्रवार(ता.१) रोजी पहाटे एक वाजून २१ मिनिटाचे सुमारास अतिशय मोठा स्फोटासारखा आवाज होऊन आग लागली होती.या स्फोटात रामेश्वर बाड याचा चुलत भाऊ अतुल आत्माराम बाड (वय २७,रा.विठलापूर,ता.आटपाडी जि. सांगली)हा डोक्याची कवटी फुटून जागीच मरण पावला होता.तर रामेश्वर बाड यांचा मेहुणा दीपक कुटे(रा. शिवापुरी जि.सांगली) हा होरपळून गंभीर जखमी झाला आहे. दीपक कुटे याच्यावर पुणे येथे उपचार सुरू आहेत.या प्रकरणाचे तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र राजुलवार यांनी केलेल्या तपासानुसार पुढील माहिती उघड झाली आहे.जागा मालक नितीन नरळे यांच्या मालकीच्या जागेतील गोदाम इमारतीचा ८० लाख रकमेचा विमा काढला होता. तसेच त्याच जागेत टायरचे गोदाम असणारा भाडेकरू रामेश्वर दत्तात्रय बाड याने या जागेतील मालाचा एक कोटी ६५ लाख रकमेचा विमा काढला होता.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .